लोकमत

# आप्पासाहेब पवार यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या ४०व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

मुख्य इमारतीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते डॉ. पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर अतिथीगृहासमोरील डॉ. पवार यांचा अर्धपुतळा व कमवा आणि शिका विद्यार्थी वसतिगृह येथील अर्धपुतळ्याला अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. किसनराव कुराडे, डॉ. टी. के. सरगर, आदी उपस्थित होते.

लोकमत

# विवेकानंद कॉलेजमध्ये सेल्फी पॉईंट उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : येथील विवेकानंद कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागामधील सेल्फी पॉईंट उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे हस्ते झाले.

विविध वनस्पतीची माहिती आणि तोंड ओळख व्हावी. औषधी वनस्पती व त्यांचे मानवी जीवनातील महत्त्व, आदींची माहिती विद्यार्थ्यांना मिळावी या उद्देशाने सेल्फी पॉईंटचा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी स्वागत करताना दिली. बी. एस्सी. भाग तीनच्या वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या पद्धतीने केले होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाचा महिला बेसबॉल संघ गुवाहाटी येथील स्पर्धेसाठी रवाना झाला. त्यांच्या समवेत पी. टी. पाटील, धनंजय पाटील आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाचा बेसबॉल संघ गुवाहाटीला रवाना

कोल्हापूर : गुवाहाटी येथे ६ ते १० जानेवारीदरम्यान होणाऱ्या अ.भा. महिला बेसबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ रवाना झाला.

संघात करिश्मा कुडचे, गायत्री जाधव, वाणी ताटी, स्वप्नाली वायदंडे, पल्लवी कांबळे, पूनम चंदनशिवे, ऐश्वर्या पुरी, अश्विनी बळे (महावीर महाविद्यालय), ऋतुजा जाधव, स्नेहा चौगुले (विवेकानंद कॉलेज), आकांक्षा पाटील, सुजाता थोरवडे, दीपाली करडे (सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज कराड), वैष्णवी पाटील (ए. वाय. सी. कॉलेज रामानंदनगर), शुभांगी पिसाळ (वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड), निकिता पाटील (गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली), डॉ. धनंजय पाटील (प्रशिक्षक), सुधाकर कुमकर (संघ व्यवस्थापक) यांचा समावेश आहे.